# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक 07/05/2023 (रविवार) सायंकाळ**

---

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**१) पो.स्टे. रामटेक** – दिनांक ०४.०५.२०२३ चे १८.०० वा. चे दरम्यान पो.स्टे. रामटेक हद्दीत फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय १५ वर्ष २ महिने २५ दिवस हिचे आरोपी नामे– कोमल गजानन चौके रा. पारशिवनी यांचे सोबत अंदाजे १ वर्षापासुन प्रेम संबंध होते. फिर्यादीचे मुलीला आरोपी कोमल गजानन चौके रा. पारशिवनी याने फुस लावुन पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. पोस्टे रामटेक स्वाती यावले मो. नं. ९०११६५५२८४ या करीत आहे.

**२) पो.स्टे. नरखेड** – दिनांक ०१/०५/२०२३ चे २०/०० वा. चे दरम्यान पो.स्टे. नरखेड हद्दीत फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ०९ महीने ही शिक्षण घेत असुन तिच्या जवळ मोबाईल फोन असुन तिला मोबाईल फोनवर कानात हेडफोन लावुन बोलण्याची सवय होती ती दिवस रात्र फोनवर बोलत राहायची. दि.०१/०५/२०२३ रोजी सायंकाळी ०८/०० वा. फिर्यादीचे पतीने विचारले मुलगी कुठे गेली त्यामुळे फिर्यादीने घरात जावुन पाहीले असता मुलगी घरात नव्हती. तेव्हा फिर्यादीने व पती यांनी मुलगी गावात तसेच त्यांचे मुळगाव येथे राहणारे नातेवाईक तसेच ईतर गावातील नातेवाईक यांना विचारपुस केले तसेच शोध घेतला असता मिळुन आली नाही. तिच्या नासमज पणाचा फायदा घेवुन कोणीतरी अनोळखी ईसमाने तिला फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास स.फौ. ५७५/समर्थ कोडापे पो.स्टे. नरखेड मो. नं. ९९२३१५८५०२ हे करीत आहे.

# फसवणुक

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर बजाज फायनान्स शोरूम मौदा येथे दिनांक ६/५/२०२३ चे ०९/४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रकाश राजेराम मेहर वय ६६ वर्ष, रा. हनुमान नगर मौदा यांचा दुधाचा व्यवसाय असुन दुध विकणेकरिता बसस्टॅड कडुन बजाज फायनान्स शोरूम समोर ०९.४५ वा फिर्यादीला दोन व्यक्ती एक काळया रंगाची मोटरसायकल (नंबर माहीत नाही) घेवुन उभे होते. फिर्यादीला आवाज दिला व फिर्यादी त्या दोन व्यक्ती कडे गेले आरोपी यांनी पोलीस असल्याचे सांगीतले फिर्यादीला बनावटी आयकार्ड दाखविले व मोठया साहेबांचा आदेश आहे गोप अंगठी घालायची नाही घरी जावुन घाला असे सांगुन फिर्यादी कडुन गोप १२ ग्रॅम अंदाजे किंमती १५०००/—रू व अंगठी ५ ग्रॅम अंदाजे किंमती ७०००/—रू. व तिस—या व्यक्तीला बोलवुन त्याचे कडुन सुदधा २ अंगठया काढुन घेतल्या ते दागीने आरोपी ने फिर्यादीच्या खिशात कागदाची पुडी बांधुन खिशात टाकले त्यानंतर समोर जावुन फिर्यादीने बघीतले असता खिशात नकली दागीने दिसले फिर्यादीच्या दागीन्याची अदलाबदल झाली यावरून फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, १७० भादवि. कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ ४५ देशमुख मो क्र ९९२२४४७०४५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**